# ५. संगणक शिक्षण

हल्ली संगणक माणसाचा जिवलग मित्रच झाला आहे. गेल्या २० वर्षात संगणकाने क्रांती करून माणसाला नवीन क्षितीजे काबीज करायला मदतच केली आहे. संगणक शिक्षण ही काळाची गरज झाली आहे. त्यामुळेच समाजात दरी निर्माण होण्यास संगणक ह्या घटकाची भरच पडली आहे. संगणकाचे ज्ञान असणारे, कमीतकमी वापरण्याचे व ज्ञान नसणारे . आजच्या तरूण पिढीची बोली भाषा सुद्धा संगणकावर आधारित झाली आहे.

जेव्हा एका तरूणीला लग्नानंतर दिवस राहिले व डॉक्टरांनी प्रसुतीची तारीख ९ महिन्यानंतरची सांगितली तेव्हा ती तरूणी काय म्हणाली असेल ? 'Computer speed is very low . It takes nine months to download a programme.' असो. आज मला वेगळयाच शिक्षणाबद्दल सांगावयाचे आहे. आपल्याला माहितीच आहे की संगणकाची Operating System असते. त्या Operating System च्या आज्ञावलींवर नजर टाकली तर असे लक्षात येईल की माणसाला माणूस म्हणून जगायचे व राहायचे असेल तर ह्या संगणक आज्ञावलीची भरपूर मदत होईल.. उदाः

Copy: नक्कल. आपण चांगल्याच गोष्टी, सवयी आत्मसात करावयाची सवय लावली तर?

Paste: चांगल्या गोष्टींची तोंडओळख पुरेशी नाही तर ती गोष्ट पूर्ण आत्मसात झाली पाहिजे त्यासाठी Paste ही आज्ञावली.

Delete: कमी करा / वगळा / विसरा. आज आपल्या आयुष्यात बरेच वेळा कटू गोष्टी घडतात, अपमान होतो. आपण बरेच वेळा आपली वाटचाल, हे पूर्वायुष्यात झालेले अपमान, कटू प्रसंग आठवून केलेली असते. आपण जर वेळेवर ह्या दुःखद, कडू आठवणी, प्रसंग विसरले तर ?

कोणी तरी म्हटले आहे की Life is too short to harbour all grudges / complaints.

Pascal हा Philosopher म्हणतो की आयुष्य कधी संपेल हे आपल्याला माहीत नाही तर मग Tension का बरे घ्यायचे ?

Bold: जे जे चांगले आहे ते आपल्या मनात ठळकपणे कोरले गेले पाहिजे.

Underline: वरीलप्रमाणे.

Alignment: कधी पुढाकार घेयचा, कधी मध्यम मार्ग स्वीकारायचा व कधी माघार घ्यायची (पुढील आक्रमण करण्यासाठी) हे वेळोवेळी ठरवता आले पाहिजे.

Format: आयुष्यातील आपल्या सीमारेषा, Margin हे आपल्याला ठरवता आले पाहिजे. आपण किती अंतर ठेवायचे, लोकांना किती जवळ येऊ दयायचे वगैरे.

शेवटी एवढेच म्हणता येईल कि प्रत्येकाने प्रत्येक माणसाकडून, वस्तुकडून शिकले पाहिजे. शिक्षणासारखे सुख नाही. मला तर वाटते कि विद्यार्थीदशा कधीच संपूच नये.